# कौशल्य विकास आणि स्वरोजगार

**डॉ. मीनाक्षी बेसेकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
गोपीकाबाई भुरे महिला महाविद्यालय
तुमसर जि.भंडारा

---

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजाबाहेर किंवा समाजाशिवाय त्याचे अस्तित्व नाही, तसेच समाजाला व्यक्तीशिवाय काहीच अर्थ उरत नाही. व्यक्ती समाजाचा मूलभूत घटक असला तरी निसर्गाच्या सान्निध्यात राहून त्याला आपले जीवन व्यतीत करावे लागते. जीवन जगत असतांना त्याला विविध कलागुण, कौशल्य आपल्या अंगी आणण्यासाठी त्या हस्तगत करण्यासाठी काही शिकणे आवश्यक असते. त्या शिवाय त्याच्या जीवनाला काहीच महत्त्व नसते. व्यक्ती जन्माला आल्यानंतर तो हाडामासाचा गोळा असतो. त्याला घडविण्याचे कार्य कुटुंबातूनच पूर्ण होत असते. त्या कनकीच्या गोळ्याला किंवा त्या हाडामासाच्या गोळ्याला आपण जसा आकार देऊ तसे मुल घडत असते. तरीसुद्धा काही बालकांमध्ये काही विशिष्ट गुण जन्मत:च असतात. ते मुल जसे जसे मोठे होऊ लागते, तसे तसे त्यातील गुणांचा विकास होत जातो. त्यालाच समाजशास्त्रीय भाषेत जन्मजात गुण असे म्हणतात. रडणे, हसणे, आवाज करणे, बघणे, या क्रिया जन्मजात असल्या तरी प्रत्येक मुल सारखे नसते. म्हणूनच म्हणतात, 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात'.

प्रत्येकाच्या जीवनात माध्यमिक शाळेतील प्रवेश ही कदाचित महत्त्वाची बाब आहे. तसेच ११ वी ला प्रवेश घेणाऱ्या मुलाच्या जीवनात ही महत्त्वाची बाब असू शकते. कारण तुमच्या भविष्याबद्दल भक्कम योजना आखण्याची हीच वेळ आहे. त्याच गोष्टी उर्वरित आयुष्याचा मार्ग ठरवतील. आणि इथून आपल्या मुलांमध्ये, मुलींमध्ये कुठले कौशल्य दडले आहे, त्याने किंवा तिने कुठले शिक्षण घ्यावे किंवा घेतले पाहिजे. या गोष्टी अवलंबून असतात आणि इथूनच नातेवाईक, शेजारी, शाळेतील शिक्षक व पालक यांचे सल्ले मिळणे सुरु होतात. इथेच आपल्या मधील क्षमताची व कमजोरीची ओळख, संधी शोधण्याचा प्रयत्न आणि ध्येयाचा पाठपुरावा करतांना येणारे अडथळे यांचा समावेश होतो.

म्हणूनच ही आपल्या जीवनाची पहिली पायरी असे म्हटले जाते. पहिली पायरी म्हणजे तुमच्या आवडीचे विस्तृत क्षेत्र ओळखणे, हे करत असतांना तुम्ही एक व्यक्ती म्हणून कोण आहात या अनुषंगाने तुमच्यातील व्यवसाय कलागुण कौशल्य निवडण्याची त्यासाठी एक यादी तयार करणे अधिक चांगले होईल.

**कौशल्य म्हणजे काय?**

आपण कोणत्या गोष्टी अधिक चांगल्या पद्धतीने करु शकतो. यांची जाणीव म्हणजे कौशल्य. ही जाणीव त्या व्यक्तीमध्ये निर्माण झाल्या. बरच तुम्हाला तुमच्यातील कोशल्याची जाणीव होते किंवा तुमच्या कौशल्याचा शोध लागेल.

**जीवन कौशल्य म्हणजे काय?**

आपल्या जीवनामध्ये सामाजिक आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, परिस्थीतीमध्ये झपाट्याने बदल होत आहे. या बदलामुळे आजचा विद्यार्थी गोंधळून गेलेला आहे. पालकांच्या आणि शिक्षकांच्या मोठ्या, अपेक्षाच्या ओझ्याखाली विद्यार्थी दडपला गेला आहे. त्यामुळे स्वत:ला समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास त्यास अडसर निर्माण होत आहे. व्यक्तींचा सर्वांगीन विकास करणे हे शिक्षणाचे अंतीम उद्दिष्ट मानले जाते. त्या सर्वांगीन विकासामध्ये मानसिक क्षमतांचा जास्तीत जास्त उपयोग करुन शिक्षण अधिकाधिक जीवन केंद्रित

करुण विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा विकास साधता येतो. व्यक्तिमत्त्व विकास हा चारित्र्य निर्मीतीशी निगडीत असतो. चारित्र्याची उत्तम प्रकारे जडण घडण होण्यासाठी मानवाला महत्त्वपूर्ण जीवन कौशल्याची आवश्यकता आहे म्हणूनच जीवन कौशल्याचा विकास शिक्षणातून घेणे गरजेचे आहे. यालाच जीवन कौशल्य असे म्हणतात.

**कौशल्याच्या अर्थ (Meaning of Skill)**

व्यवसाय तसेच वैयक्तिक जीवनामध्ये आपल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी व यश संपादनासाठी अनेक प्रकारची गुणवत्ता व कौशल्ये असावी लागतात. प्रत्येकाजवळ सर्व कौशल्ये अंगीभूत असतील असे नाही. तरीपण आपल्या कार्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये त्याने विकसित करणे गरजेचे असते. काही जनांना ही कौशल्ये उपजत प्राप्त होतात. काही जणांना ही संस्कार व प्रशिक्षणाने मिळतात? तर काहीपण परिणामपूर्वक आत्मसात करतात. जसे

१. विविध कामे यशस्वीपणे पार पाडण्याची कला म्हणजे कोशल्य होय.
२. व्यवसाय, प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आवश्यक गुण परिश्रमपूर्वक आत्मसात करणे म्हणजे कौशल्य प्राप्त करणे होय.

**यशस्वी जीवनाची वाटचाल करण्याकरीता खालील कौशल्याची गरज असते.**

१. संदेश वाहनाचे कौशल्या (प्रभावी संवाद करण्याचे कौशल्य.)
२. सुयोग्य नियोजन व उचित निर्णय घेण्याचे कौशल्य.
३. समस्याचे तत्परतेने निराकरण करण्याचे कौशल्य.
४. पुढाकार घेऊन काम करण्याचे कौशल्य.
५. वेळ व स्वयंव्यवस्थापनाचे कौशल्य.
६. समुहाद्वारे कार्य करण्याचे कौशल्य.
७. समाजात जगण्याचे कौशल्य.
८. सकारात्मक दृष्टिकोणाचे कौशल्य.
९. मानवी संबंध विकसित करण्याचे कौशल्य इत्यादी.

म्हणजेच कौशल्याचा विकास करुण व्यक्तीमधील क्षमता कशा वाढविता येतील याची चिंता सर्वांनाच असते.

**कौशल्याचे प्रकार**

१. वर्तन कौशल्य
२. कार्य कौशल्य
३. आंतर – व्यक्तीचा कौशल्य

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी मध्ये व्हीजन २०२० हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथातला प्रतिपादनाचा आणि कौशल्य विकासाचा कल्पनेचा निकट संबंध आहे. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आपले मंत्रिमंडळ तयार केले आणि त्याने कौशल्य विकास आणि उद्योजकता हे नवे खाते तयार केले. भारताच्या इतिहासात प्रथमच असे खाते तयार करण्यात आले होते. कारण मोदी यांना याचे महत्त्व पटले होते. म्हणूनच, १) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, २) कौशल्य विकास योजना महाराष्ट्र, ३) दिव्यांगासाठी कौशल्य विकास योजना या द्वारे कौशल्य विकास योजनांचा विकास करण्याचे

कार्य चालू केले. कारण यातूनच व्यक्तीला स्वयंरोजगार करता येऊ शकतो. प्रत्येक व्यक्तीला सरकारी नौकरी मिळेलच असे नाही. म्हणूनच कौशल्य विकासामुळे व्यक्तीला स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त होत असते.

**स्वयंरोजगाराचा अर्थ**

स्वयंरोजगार म्हणजे स्वत:ने निर्माण केलेला रोजगार. स्वयंरोजगार म्हणजे स्वत:च्या ज्ञान व कौशल्याचा वापर करुन व्यक्तीने निर्माती सेवा व व्यापार क्षेत्राशी एखादा व्यवसाय निर्माण करुण किंवा सुरु करुन स्वत:च्या उपजीविकेचे साधन निर्माण करणे होय. किराणा दुकान, वाहन दुरुस्ती, टीव्ही दुरुस्ती, भाजी फळे विक्रेता, टेलर, इस्त्री, करणारा मेस चालवितो, इलेक्ट्रीक उपकरणाची दुरुस्ती, दुग्ध व्यवसाय,फळे प्रक्रिया उदयोग, इत्यादी उदाहरणे, स्वयं रोजगाराची आहेत.

**स्वयंरोजगाराची गरज : (Needs Of Self employment)**

१. भारतीय माणूस मुळाचत कुटुंबाला प्राधान्य देतो. त्यामुळे घर सोडत किंवा गावापासून लांब राहून नोकरी करण्याची सगळ्याचीच मानसिकता नसते. अशावेळी घराजवळ किंवा गावातच केलेला स्वयंरोजगार उपयुक्त ठरतो.

२. भारताची लोकसंख्या प्रचंड वाढलेली आहे. या प्रचंड लोकसंख्येला नोकऱ्या, रोजगार मिळवून देणे शक्य नसल्यामुळे स्वयंरोजगाराकडे वळणे आवश्यक ठरत आहे.

३. आपल्या देशात नोकरी मागणाऱ्यांची संख्या नैकरी देणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे नोकरी मिळूच शकत नाही, मग रोजगाराचा प्रश्न मिटू शकतो.

४. आपल्या देशात अनेक लोक जे शिक्षित नाहीत पण त्यांच्याकडे वंशपरंपरेने चालत आलेली काही मूलभूत कौशल्ये आहेत त्यांनी नोकरी मिळेलच किंवा त्यांच्या कौशल्याचा उपयोग नोकरीत होईलच असे नाही म्हणूनच त्याच्या कौशल्याला व गुण वैशिष्ट्यांना योग्य वाव मिळण्यासाठी व उपजीविकेचे साधन म्हणून स्वयंरोजगार फायदेशीर ठरतो.

कौशल्य विकास मात्र ग्रामीण आणि नागरी दोन्ही स्वरुपाचा असतो. ग्रामीण क्षेत्रातील विकास आणि शहरी क्षेत्रातील विकास आणि शहरी क्षेत्रातील विकास यामध्ये फरक असतो. स्वयंरोजगार आजच्या काळातील आवश्यक गरज म्हणता येईल. कारण अनेकांच्या नोकऱ्या उदयोगधंदे बंद पडले, कारखान्यातील मजूर कमी करण्यात आहे. खाजगी कारणामुळेही नोकऱ्यांना हात धुवावे लागले आणि व्यक्तीवर उपासमारीची वेळ आली. यासाठी कौशल्य विकास शिक्षणामुळे व्यक्ती जीवन जगण्याची संधी मिळाली. आपले व आपले कुटुंब जिवंत ठेवता आले. अब्दुल कलाम म्हणतात की, मंजील चाहे कितनी भी उंची क्यो न हो, रास्ते हमेशा पैरो के निचे ही होते है. आपल्याला आपल्या कौशल्यानुसार वाटचाल करायची आहे. ''रस्ते सांगणारे पुष्कळ आहेत. पण त्या रस्त्यावर चालायचे आपल्याला आहे. हे विसरुन चालणारे नाही.

**संदर्भ ग्रथ सूची**

१. समाजशास्त्र विषय ओळख डॉ. अग किर्ती चीत्ते शीक्षण शास्त्र, २०१९

२. डॉ.प्रदीप आगलावे, 'समाजशास्त्र परिचय'साईनाथ प्रकाशन

३. डॉ. साहेबराव चव्हाण, प्रो. आकाश बेले, 'कौशल्य विकास', साई ज्योती प्रकाशन

४. ११ वी १२ नंतरचे शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन, उत्तम पाटील पब्लिकेशन

५. योजना मासिक २०१९